भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

जाहिरात

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने वा महापालिकेविरुध्द भिवंडी तालुका न्यायालय, ठाणे जिल्हा न्यायालय, औद्योगिक न्यायालय, मुंबई उच्च न्यायलय आणि सर्वोच्च न्यायालय येथे विविध दावे, याचिका दाखल होत असतात. या प्रकरणांत महापालिकेची बाजू मांडण्याकरिता महापालिकेच्या वकील पॅनलवर नियुक्ती करणे करिता खालील नमुद केलेल्या अटी व अर्हता पूर्ण करणा-या इच्छुक वकील उमेदवारांकडून **दि.०६/०७/२०१९** रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. **दिनांक १०/०७/२०१९** रोजी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील ५ व्या मजल्यावरील रुम नं.५०६ येथील सभागृहात मुलाखती **(walk-in interview)** घेण्यात येईल.

अ) मा. सर्वोच्च न्यायालयाकरिता वकीलाची अर्हता:-

१) सर्वोच्च न्यायालयात याचिकांचे काम चालविण्याचा किमान १० वर्षे अनुभव असलेल्या वकील व्यवसायी, कर विषयक कायदे, स्थानिक स्वराज्य स्वंस्था संबंधीचे कायदे, लवाद कायदा, कामगार विषयक कायदे इत्यादी मध्ये तज्ञ असलेल्या वकीलास प्राधान्य दिले जाईल.

ब) मुंबई उच्च न्यायालयाकरिता वकीलाची अर्हता:-

१) उमेदवार हा किमान मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर.

२) उमेदवार हा महराष्ट्र राज्य बार कॉन्सिलचा सनद धारक आणि किमान ५ वर्षे उच्चन्यायालयात वकिल व्यवसायी म्हणून अनुभव असलेला असावा.

३) उमेदवार हा उच्च न्यायालायतील दिवाणी व फौजदारी प्रकरणे हाताळण्याचा अनुभव असलेला व उच्चन्यायालयाच्या कार्यपध्दतीचे उत्तम ज्ञान असलेला असावा.

४) कर विषयक कायदे, स्थानिक स्वराज्य संस्था विषयीच्या कायद्यांचे, लवाद कायदा, कामगारविषयक कायदे, दिवाणी व फौजदारी कायदे, महापालिका संबंधीचे न्यायालयान प्रकरणे हाताळण्याचा उत्तम ज्ञान व अनुभव असलेला असणे आवश्यक आहे.

क) मुंबई उच्चन्यायालयाकरिता सिनियर कौन्सील वकीलाची अर्हता:-

१) मुंबई उच्च न्यायालयात सिनिअर कौन्सील म्हणून काम पहाणारे आणि विशेषत: महापालिका संबंधीचे प्रकरणे हाताळणे - कायदे तज्ञ (जेष्ठ विधीज्ञ)असणे आवश्यक आहे.

कृपया मागे पहा-

ड) जिल्हा न्यायालय, ठाणे करिता वकीलाची अर्हता-

१) महापालिकेच्या वतीने वा विरुध्द दाखल होणारी अपिले, विशेष दिवाणी दावे, फौजदारी प्रकरणे हाताळण्याचा ५ वर्षे जिल्हा व सत्र न्यायालयाच्या कामाचा अनुभव असलेला वकील व्यवसायी.

इ) औद्योगिक व कामागार न्यायालय, ठाणे करीता वकील अर्हता:-

१) औद्यौगिक व कामगार न्यायालयातील प्रकरणे हाताळॉण्याचा १० वर्षाचा अनुभव असलेला वकील व्यवसायी.

२) कामगार विषयक कायद्याचे, औद्योगिक व कामगार न्यायालयीन कार्यपध्दतीचे उत्तम ज्ञान व अनुभव असलेला वकील व्यवसायी.

ई) भिवंडी तालुका न्यायालयाकरीता वकीलाची अर्हता:-

१) भिवंडी तालुका न्यायालयातील फौजदारी व दिवाणी दावे हाताळण्याचा किमान ३ वर्षे तालुका न्यायालयाचा अनुभव व ज्ञान असलेला वकील व्यवसायी. भिवंडी शहरातील स्थानिक वकील व्यवसायी यांना प्राधान्य दिले जाईल.

विशेषतः १) महापालिका संबंधीचे कायदे २) महानगरपालिकेची न्यायालयीन प्रकरणे हाताळणेचा अनुभव असलेले अन्य महापालिका वकील पॅनलवर काम केल्याचा अनुभव असलेला ३) विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम – (एल.एल.एम.) शैक्षणीक अहर्ता असलेला वकील व्यवसायी यास प्राधान्य दिले जाईल.

उ) मोटर अपघात प्राधिकरण मुंबई, मानवी हक्क आयोग मुंबई, राष्ट्रिय हारित प्राधिकरण पुणे, वक्फ न्यायालय औरंगाबाद या प्राधिकरणातील प्रकरणा करीता वकीलांची अहर्ता :-

त्या-त्या प्राधिकरणातील प्रकरणे चालविण्याचा ३ वर्षाचा अनुभव असलेले व्यावसाची वकील.

इच्छुक उमेदवारांनी अर्जा सोबत व्यवसायीक अनुभवासंबंधी स्वःघोषणा पत्र जोडणे आवश्यक आहे. सदर अर्ज हे पोस्टाने महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील विधी विभागात स्विकारले जातील.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वकील पॅनलवर कोणत्याही उमेदवारची नियुक्ती करणेचे व नियुक्ती नाकारणेचे अधिकार वा नियुक्त प्रक्रियेत बदल करणेचे सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

सही/- **(xxx)**
(मनोहर हिरे, भा.प्र.से.)
आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
भिवंडी.